

व्हिडिओ पहा

# कोरोना

एका विषाणूमुळे अख्खं जग झालं भयभीत
त्यावरील उपायाचं लवकर सापडेना गुपित
चीनने सर्व जगाला वाटला हा खाऊ
विषाणूने केले सगळ्यांना खाऊ का गिळू ॥

रस्ते झालेत सामसूम, मॉल पडलेत ओस
मृत्युच्या तांडवापुढे नाही कुठलीच हौस
पुढारलेले वाटणारे देशही माघारले ह्या स्थितीत
कारण कोरोनाची दहशतच आहे तशी ॥

गरीब-श्रीमंत जातपात सगळेच गेलेत विसरून
परस्पर मदत करण्या विशिष्ट अंतर राखून
नाका तोंडाला पट्टी, हात धुण्या सॅनिटायझर
आधी कधीच पाहिली नाही अशी महामारी दुर्धर ॥

लॉकडाऊनमुळे बसावे लागले घरात
अनेक प्रश्नांचे कोंडाळे घेवून मनात ।
साधी राहणी उच्च विचारसरणी ही आपली संस्कृती
तीसोडून आपण धावलो ब्रँडच्या नादी ॥

हॉटेल्स सगळी बंद, घरी बनवा स्वयंपाक
उठसूठ बाहेर खाणाऱ्यांना तर ही मोठी चपराक ।
घरच्या अन्नाचा सुग्रणपणा हॉटेलच्या चवीत नाही
पण, फॅशनच्या नावाखाली जपलं जायचं भारी ॥

गृहिणीची घरातील लगबग अन पती, मुलांची मदत
लॉकडाऊनपूर्वी असा अनुभव आला असेल क्वचित
बँक कर्मचाऱ्यांचेही योगदान आहे ह्यात मोठं,
कारण पैशाशिवाय प्रत्येक काम असतं खोटं ॥

डॉक्टर नर्स आणि पोलिस घेताहेत अहोरात्र मेहनत
मुलंबाळं, घरदार, प्रकृती सगळं विसरून फक्त
माणसातली माणुसकी आहे इथे जिवंत
त्याचेच प्रत्येक ठिकाणी प्रतीक मूर्तिमंत ॥

त्यांच्यासाठी एक मोठा सलाम आपण करावा
हाच आपला त्यांना मानाचा मुजरा समजावा।
एका छोट्या विषाणूमुळे सगळ्या जगाची गती थांबली
कुटुंबाची एक अशी परिभाषाही आपण अनुभवली ॥
ह्या विषाणूमुळे आपण एवढे नक्कीच शिकलो कि,
आपण आपल्या थेट परंपरेपर्यंत येऊन पोहोचलो
वाईटातून चांगले एवढच म्हणावसं वाटतं
आपण आपल्या पुढच्या पिढीला हिंदू संस्कृतीशी बांधलं ॥

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे.